महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३२८ वा दिनांक : ११/११/२०२५ वार : मंगळवार

## हिंमत असेल तर तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वात चौकशी करा, नाना पटोलेंचे मुख्यमंत्र्यांना आव्हान




**भंडारा :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या जमीन घोटाळ्याप्रकरणी चौकशी केली जाणार आहे. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांमध्ये हिंमत असेल तर त्यांनी तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात चौकशी समिती गठित करावी, असे आव्हान कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी केले आहे.

नाना पटोले म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी विकास खरगेंच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली आहे. या पद्धतीच्या चौकशीचा आणि कमिटीचा फार्स करून जनतेची जी दिशाभूल चाललेली आहे. महाराष्ट्र रोज लुटण्याचे काम सुरू आहे. तुमच्यात खरोखरच हिंमत असेल आणि दूध का दूध, पाणी का पाणी करायचे असेल तर तुकाराम मुंढेंच्या अध्यक्षतेखाली कमिटी बसवा, असे आव्हान केले आहे.

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, पार्थ पवारांच्या 1800 कोटींच्या जमीन घोटाळ्यात औद्योगिक नवीन धोरण आणायचे आणि स्टॅम्प ड्युटी वाचवण्याचे धोरण ही फक्त एक पद्धत आहे. मुंबई आणि बीकेसी मधील 500 एकर पेक्षा अधिक जमीन, सी लिंकच्या बाजूची जमीन, रस्ते विकास महामंडळाची जमीन, या सगळ्या जमिनी कशा आणि काय भावाने दिल्या? नवी मुंबईचे मार्केट यार्ड होते, ती जमीन मोदीजींच्या मित्रांना आयटी पार्कच्या नावाने देण्यात आली. असे सगळे सुरू असताना राज्याचे मुख्यमंत्री म्हणतात की ही गंभीर बाब आहे.

महाराष्ट्रात अशा अनेक प्रकारच्या जमीन घोटाळ्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्याची चौकशी बसवण्याची गरज नाही, ते कागदावरच स्पष्ट होते. शासन तुम्ही चालवत आहात, सरकार तुम्ही चालवत आहात, अशा वेळेस चौकशी बसवायची गरजच काय? असा प्रश्न नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे. पार्थ पवार यांच्या कंपनीने पुण्यातील मुंढव्यातील 1800 कोटींची जमीन 300 कोटींमध्ये लाटण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी असलेली 21 कोटींची स्टॅंप ड्युटीही भरली नाही. हे प्रकरण समोर आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खरगे यांच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. यावरून नाना पटोले यांनी टीका केली आहे.

## आरएसएस रजिस्टर्ड आहे का? निधी कुठून येतो? प्रकाश आंबेडकरांचा संघावर हल्लाबोल



**जालना :** वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीय स्वयं सेवक संघावर पुन्हा एकदा हल्लाबोल केला आहे. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विट करत संघाला उद्देशून तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. आरएसएस रजिस्टर्ड संस्था आहे का? नसेल, तर इतके फंडिंग कसे काय मिळत आहे? तसेच संघाने भारतीय तिरंगा स्वीकारला नव्हता, हे खरे आहे की खोटे? असा सवाल आंबेडकरांनी उपस्थित केला आहे.

प्रकाश आंबेडकरांनी ट्विट करत म्हटले की, इकडची तिकडची बकवास बंद करा आणि माझ्या तीन प्रश्नांचे उत्तर द्या. आरएसएस ही नोंदणीकृत संघटना आहे का? जर ती नोंदणीकृत नसेल, तर तिला कोट्यवधी रुपयांचा निधी कसा मिळत आहे? हे खरे नाही का की आरएसएसने भारतीय ध्वज स्वीकारला नाही? हे खरे नाही का की आरएसएसने अनेक दशकांपासून नागपूर येथील मुख्यालयात तिरंगा फडकवला नाही? हे खरे नाही का की गोळवलकर आणि सावरकर यांनी बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले समतावादी, लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष संविधान नाकारले आणि मनुस्मृतीला संविधान बनवण्याची मागणी केली? असे प्रश्न आंबेडकरांनी उपस्थित केले आहेत.

वंचित बहुजन आघाडी आणि त्यांचे सर्व कार्यकर्ते आता आरएसएस आणि मनुवादी शक्तींना तोंड देण्यासाठी एकत्र आले आहेत. तुम्ही आणि तुमच्या अर्ध्या अंतर्वस्त्रांच्या टोळीने एक गोष्ट समजून घेतली पाहिजे, आपला देश मनुस्मृतीने नव्हे तर बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाने चालेल, असेही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

दरम्यान, आज प्रकाश आंबेडकर यांची जालना येथे जाहीर सभा झाली. यावेळी बोलताना त्यांनी राज्यातील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य केले आहे. आज धर्म नव्हे तर ओबीसी धोक्यात आहेत. ओबीसी सत्ताधारी झाल्याशिवाय आरक्षण वाचणार नाही. ओबीसींच्या राजकीय लढ्याला सुरुवात झाली आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले. जालना येथे जाहीर सभेत ते बोलते होते. जरांगे मुंबईत ठिय्या मांडून बसले आणि कॉंग्रेस, भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीचे 190 आमदार जरांगेंच्या दर्शनाला गेले. हेच आमदार देवेंद्र फडणवीस यांना भेटले तशी फडणवीस यांची भाषा बदलली, अशी टीका आंबेडकरांनी केली आहे.

## राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दोन्ही गट अखेर एकत्र : मंत्री हसन मुश्रीफ यांची यशस्वी मध्यस्थी; कोल्हापूरची चंदगड नगरपंचायत एकत्र लढवणार



**कोल्हापूर :** राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शरद पवार व अजित पवार या दोन्ही गटांनी कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड नगरपंचायत मिळून लढवण्याची घोषणा केली आहे. सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री हसन मुश्रीफ यांनी या प्रकरणी दोन्ही गटांची यशस्वी मनधरणी केली आहे. राष्ट्रवादीतील बंडाळीनंतर प्रथमच हे दोन्ही गट या निमित्ताने एकत्र आलेत. त्याची राज्याच्या राजकारणात खमंग चर्चा रंगली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची नुकतीच एक मुंबईत बैठक झाली होती. या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप वगळता सर्वच पक्षांशी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे शरद पवार गट अजित पवारांच्या गटाशी हातमिळवणी करणार का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत होता. पण आज अखेर या दोन्ही पक्षांनी चंदगड नगरपंचायतीच्या निवडणुकीत एकत्र येण्याची घोषणा करून या चर्चेला पूर्णविराम दिला. राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी या आघाडीसाठी यशस्वी मध्यस्थी केली.

यासंबंधीच्या माहितीनुसार, शरद पवार गटाच्या नंदाताई बाभूळकर यांच्या गडहिंग्लज येथील कार्यालयात एक बैठक झाली. या बैठकीला अजित पवारांच्या पक्षाचे राजेश पाटील उपस्थित होते. त्यात दोन्ही नेत्यांनी विस्तृत चर्चा करून चंगडग नगरपंचायतीच्या निवडणुकीत भाजप विरोधात रान पेटवण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी शहरविकास आघाडी स्थापन केली आहे. नंदाताई बाभूळकर व राजेश पाटील यांनी सोमवारी एका संयुक्त पत्रकार परिषदेद्वारे या आघाडीची घोषणा केली. या आघाडीमुळे चंदगड नगरपंचायत काबीज करण्याची व्युहरचना आखणाऱ्या भाजपची मोठी अडचण झाली आहे.

अजित पवारांनी 2023 मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये मोठे बंड केले होते. त्यांनी आपल्या 40 समर्थक आमदारांच्या मदतीने शरद पवारांच्या नेतृत्वाला आव्हान देत आपला वेगळा गट स्थापन केला होता. त्यानंतर पक्षावरही दावा सांगितला होता. या प्रकरणी निवडणूक आयोगात झालेल्या सुनावणीनंतर त्यांच्या गटाला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हे नाव व घड्याळ हे निवडणूक चिन्ह मिळाले होते. या घटनाक्रमामुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटातील राजकीय वैमनस्य टोकाला गेले होते. पण आता हे दोन्ही पक्ष राजकीय गरजेनुसार एकत्र येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यानुसार, चंदगड नगरपंचायतीतील निवडणूक आघाडी राज्यातील इतर जिल्ह्यांतही पहावयास मिळेल असा दावा केला जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ नोव्हेंबर २०२५


# ईगल फौंडेशन चा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** ईगल फौंडेशन च्या वर्धापन दिनानिमित्त आष्टा, ता. सांगली येथील डॉ. अण्णासाहेब डांगे शिक्षण संकुलात अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी पद्मश्री दादा इदाते, माजी मंत्री डॉ. अण्णासाहेब डांगे, डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समुहाचे विश्वस्त सुर्यकांत तोडकर, ऑल इंडिया धनगर समाजाचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे, सौ. संगिता शिंदे, दै. रोखठोक चे संपादक सुरेश माडकर, कार्यकारी संपादक सुरेश राठोड, शिरीष कुलकर्णी, डॉ. शंकर अंदानी, काकासाहेब देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. अंदानी यांचे ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी.. एक शोध या ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.यावेळी ईगल फौंडेशन च्या सकारात्मक, विधायक व सातत्यपुर्ण वाटचालीबद्दल सर्वच मान्यवरानी कौतुक केले. यावेळी पद्मश्री दादा इदाते, माजी मंत्री अण्णासाहेब डांगे, दै. रोखठोक चे कार्यकारी संपादक सुरेश राठोड, सुर्यकांत तोडकर यांनी मार्गदर्शन केले. सर्व उपस्थितांचे स्वागत फौंडेशनचे अध्यक्ष विलासराव कोळेकर यांनी केले. आभार प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मानले. तर अत्यंत प्रभावी सुत्रसंचालन पोपट काटकर यांनी केले. यावेळी पुढील मान्यवरांचा गौरव करण्यात आला.श्री संजय कुंडलीक जाधव, गोपाल जगदेव भावसार, अस्लमभाई सय्यद, ॲड. प्रमोद लक्ष्मीबाई अंकुश भोकरे, डॉ. राजेंद्र नामदेव कवठेकर, तुकाराम बाबू बंडगर व सौ. स्वाती तुकाराम बंडगर, पत्रकार युवराज आनंदराव निकम, पत्रकार चंद्रकांत गुरव, प्रताप शिरतोडे, अशोक जनार्दन पाटील, महेंद्र सिताराम निकम, प्रा. डॉ. दिलीप गाडे, अशोक गोरड, हिराकांत फुलचंद गाडेकर, प्रा. दिलीप हिरा बरकडे, केदार चंद्रकांत भस्मे, प्रा. विशाखा जयश्री प्रभाकर साटम, सौ. राधिका गोपाल भावसार, प्राचार्या यशोदा नाईक, सुरेय्यापरवीन सैय्यद जिलानीपाशा जाहागिरदार, श्रीमती शैला गंगाधर बैसाणे, सौ. अर्चना सचिन डाके, सौ. लिना बाळासाहेब पांडे, सौ. प्रतिभा पांडूरंग थोरात, प्रा. सौ. रेखा रमेश कटके, सौ. गायत्री चंद्रकांत मोहाडीकर, सौ. सुनिता प्रकाश गढळे, प्रा. लहूकुमार दिनकर थोरात, प्रा. सोमनाथ लांडगे, रावसाहेब अर्जुन मुरगी, प्रदीप महादेव खोत, प्रा. राम घुले, सुदाम दगडू धाडगे, संभाजी हिंदूराव माळी, प्रा. संजय नकटू लेनगुरे, आनंदराव शंकर कचरे, रामचंद्र पुकळे, संजय कात्रट, राजकुमार कांबळे, शाहीर श्रीपती नांगरे, ॲड. दामोदर माणिकराव कोंडे, डॉ. गौरव लालासाहेब पाटील, निवृत्ती छानबा जाधव, अमृत संभाजी गोळे, नितीन काशिनाथ ओहाळ, मोहन बागमार, पोपट माणिकराव काटकर आदींना मानपत्र, सन्मानचिन्ह, मानाचा फेटा बांधून गौरविण्यात आले.या सोहळ्याकरिता फाऊंडेशन चे पदाधिकारी बाबासाहेब राशिनकर, अभिजित पाटील, अशोक शिंदे, संजय गायकवाड, दिनेश कांबळे, दिपक पोतदार, प्रा. दिलीप जाधव, प्रकाश वंजोळे, प्रा. विजय जगताप, संजय थोरात, सतिश भोसले, डॉ. शिवपुत्र कनाडे आदींनी परिश्रम घेतले.




# बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात गुणवंतांचा गौरव




**जालना :** जिद्द, प्रामाणिक प्रयत्न असेल तर कोणतेही यश प्राप्त करता येते. ज्ञानाच्या बळावर आपणाला हवे ते मिळवता येते. प्रामाणिक प्रयत्न केल्याशिवाय तुम्हाला पुढे जाता येत नाही. म्हणून स्वप्न मोठी ठेवा. आपल्या आई वडिलांच्या इच्छा पूर्ण करा असे प्रतिपादन श्री. राजेंद्रजी बारवाले यांनी गुणवंतांचा गौरव करताना केले.महाविद्यालयातील कल्याणी कोल्हे हिचा मुंबई येथील एसबीटी मेडिकल कॉलेज येथे एमबीबीएस प्रथम वर्षाकरिता आणि कुमारी रेश्मा राठोड हिचा गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अवसरी, पुणे येथे प्रथम वर्षाकरिता प्रवेश मिळाला असून त्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी प्राचार्य कविता प्राशर म्हणाल्या, कु. कल्याणी आणि कु. रेश्मा या दोघीही अत्यंत हुशार असून त्यांनी अभ्यासात सातत्य ठेवले म्हणूनच त्यांना हे यश संपादन करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांची उत्कृष्ट तयारी करून घेतली. शिक्षकाचे प्रयत्न आणि विद्यार्थ्यांची कष्ट करण्याची तयारी यात सुंदर ताळमेळ असला की शैक्षणिक गुणवत्ता वाढीला लागते. या दोघींच्या यशामागे शिक्षकांनी केलेले परिश्रम हे सुद्धा महत्त्वपूर्ण आहे.यावेळी पालक विष्णू कोल्हे म्हणाले की, महाविद्यालयातील शिक्षकांनी घेतलेले परिश्रम हे अत्यंत मोलाचे आहे येथील संस्कार आणि शिस्त हे विद्यार्थी केंद्रित असल्यामुळे यश मिळाले आहे. या ठिकाणी विद्यार्थिनींना उत्तम वातावरण मिळते. येथील संस्कार घेऊनच आमच्या मुली भविष्यात यशस्वी होतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार प्रा. सुधीर देशपांडे यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

# वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** सोमवार (दि. 10) रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आलूर येथे सामाजिक कार्यकर्ते सुनील कुडकुले यांचा वाढदिवस शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटून करण्यात आला. यावेळी शाळा व्यस्थापन समितीचे अध्यक्ष श्री शटप्पा धोतर्गे व सदस्य श्री हणमंत बिराजदार उपस्थित होते. आजच्या तरुण पिढीसमोर आदर्श निर्माण व्हावा यासाठी श्री सुनील यांनी केक न कापता शैक्षणिक साहित्य वाटप करून आपले सामाजिक उत्तरदायित्व पार पाडले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुनील भैया व त्यांच्या मित्र परिवाराने परिश्रम घेतले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ नोव्हेंबर २०२५


## अकाली पावसामुळे शेतकऱ्यांना कापूस वेचणीसाठी मजूर टंचाई



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यात पावसाने उघडीप देताच शेतकरी कापूस वेचणी मका जमा करणे पांगवणे दररोज उघडणे झाकणे ही कामे शेतकऱ्यांना करावी लागत आहे गत सहा महिन्यापासून पावसाळा सुरू असून पेरणी लागवडीची वेळ असून रब्बी पीक हंगाम समोर असतांना पावसामुळे लांबणीवर पडले आहे यंदा पावसाने सहा महिने प्रक्रिया सुरू ठेवली सतत पाऊस त्यात अती तीव्र अतिवृष्टी मुसळधार पाऊस सातत्याने ढगाळ वातावरण त्यामुळे खरीप पिक हंगामाची पूर्ण वाट लावून दिली आहे काही शेतकऱ्यांची खरीप पिक हंगामाची मक्का सोंगणी करून शेतात पडून आहे तर काही मक्का मातीमोल केली आहे कापूस मोठ्या प्रमाणात फुटले सततच्या पावसाने त्याच्या वात्या केल्या आहेत कापसाची मोठ्या प्रमाणात नुकसान झाली आहे आता तीन-चार दिवसापासून उघडीप दिली आहे कडक ऊन पडले आहे शेतकऱ्यांनी कुटुंबासह शेतात धाव घेतली आहे कापूस वेचणी मक्का कणसं जमा करणे पसरवणे कामे हाती घेतली आहे तर रब्बी पिक हंगामासाठी शेतात रोटाव्हेटर मारणे मोघडणे रब्बी पिके गहू हरभरा व ज्वारी लसूण इतर पिके पेरण्याची लगबग सुरू केली आहे ठाकरवाडी निरगुडी पिंपरी या परिसरात थंडीचा चांगलाच कडाका वाढला आहे ठाकरवाडी,भिलवाडीतील आदिवासी ठाकर भिल्ल समाज हा दरवर्षी 90 टक्के ऊस तोडीला जातो दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षीसुध्दा ऊस तोडीला नगर नाशिक पुणे दौंड गंगापूर कन्नड अशा वेगवेगळ्या जिल्ह्यातून ऊस तोडीला गेला आहे ऊस तोडीला गेल्यामुळे निरगुडी पिंपरी तिसगाव गल्लेबोरगाव या शिवारातील शेतकऱ्यांना कापूस वेचणीसाठी मजूर मिळत नसल्याने कापूस खाली गळायला सुरुवात झाली आहे त्यात शासनाने कर्जमाफी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा आर्थिक मदत पिक विमा न मिळाल्याने शेतकऱ्यांनी शासनावर नाराजी व्यक्त केली आहे.

## तिफण सखी मंचची सारोळा येथे निसर्गभ्रमंती



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** छत्रपती संभाजीनगर येथील मयुरपार्क परिसरात तिफण सखी मंच व तिफण ट्रेकिंग ग्रुपची स्थापना करण्यात आली आहे. या ग्रुपच्या माध्यमांतून विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच निसर्ग भ्रमंती चे आयोजन करण्यात येते. दर रविवारी ट्रेकिंग व निसर्गभ्रमंती चे आयोजन करण्यात येते. रविवारी तिफण सखी मंच व तिफण ट्रेकिंग ग्रुप चा स्नेह मेळावा व निसर्ग भ्रमंतीचे आयोजन करण्यात आले होते. सारोळा जंगलात भ्रमंती करून निसर्ग पर्यटनाचा आनंद घेतला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे ही आयोजन केले होते. यावेळी सुखना नदी ऊगमस्थान, गणेश मंदिर, यांना भेट दिली विविध वनस्पती, ची माहिती घेतली. गप्पा, गाणी, काव्य वाचन आदी कार्यक्रम संपन्न झाले. या कार्यक्रमास ग्रुपचे मार्गदर्शक डॉ. शिवाजी हुसे ,वृषाली सोनवणे, ऊर्मिला हुसे, विलास कापडे, वैशाली कापडे, रेवन नाथ ताठे, मीना ताठे, सोमनाथ ताठे, प्रतिभा ताठे, अनिल ताठे, भारती ताठे, हरिदास पाले, कल्पना पाले, अर्चना ताठे, अनुसूया मुगले प्रभाकर मुंडे, योगेश्वरी मुंडे आलोक पाले, श्रीनिती ताठे सांची ताठे, उन्नती ताठे, रुद्र ताठे, देवेश ताठे, राणी मगर

## भाजप ची स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आढावा बैठक संपन्न




**कन्नड (अरुण थोरात) :** आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कन्नड-सोयगाव येथे भारतीय जनता पक्षाची आढावा बहुजन कल्याण मंत्री आ. अतुल सावे, आ. प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शात उत्साहात संपन्न झाली. बैठकीत आगामी निवडणुका, संघटन, बुथ समित्या, जबाबदाऱ्या आदींचे नियोजन करण्यात आले. आगामी सर्व निवडणुकांत घवघवीत यश मिळवून भाजप चा झेंडा फडकविण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागण्याचे अवाहन करण्यात आले.भाजपच्या विजयाचा संकल्प, संघटन बळकटी आणि कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरल्याची प्रतिक्रिया जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी दिली.याप्रसंगी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभाग मंत्री अतुलजी सावे, गंगापूर चे आमदार प्रशांत बंब, भाजपा पश्चिम जिल्हा अध्यक्ष संजय खंबायते,भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. संजय गव्हाणे, जेष्ट नेते मनोज पवार, भाजपा जिल्हा सरचिटणीस सुभाष आबा काळे, नगरपरिषद निवडणूक प्रमुख किशोर आबा पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य रमेश जाधव,भाजपा कन्नड पूर्व मंडळ अध्यक्ष गणेश घुगे, पश्चिम मंडळ अध्यक्ष ललित सुरासे, मध्य मंडळ अध्यक्ष सुनील पवार, तालुका सरचिटणीस श्रीराम जंजाळ, तालुका उपाध्यक्ष कल्याण जंजाळ, विष्णू राठोड, बाबासाहेब जाधव, उत्तमराव राठोड यांच्यासह तालुक्यातील भाजपा पदाधिकारी,कार्यकर्ते, शक्तीकेंद्र प्रमुख, बुथप्रमुख, उपस्थित होते.

## ओबीसी नेते वाघमारे यांकडून दराडे यांना शुभेच्छा



**बुलढाणा जिल्हा (महेश मुंढे) :** सिंदखेड राजा तालुक्यातील किनगाव राजा जिल्हा परिषद सर्कलसाठी सध्या संतोष भाऊ दराडे यांनी निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. त्यांच्या या प्रयत्नांना ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी विशेष शुभेच्छा दिल्या. अलीकडेच जालना येथे ओबीसी आरक्षण बचाव महामेळावा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भव्य प्रमाणात पार पडला. या मेळाव्याला नवनाथ वाघमारे उपस्थित होते, तर संतोष भाऊ दराडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह पाच गाड्यांच्या ताफ्यासह या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. मेळाव्यात अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर व नवनाथ वाघमारे आणि संतोष भाऊ दराडे यांच्यात निवडणुकीसंदर्भात आणि ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी लढ्याबाबत चर्चा झाली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे अनेक पदाधिकारी आणि नेते उपस्थित होते.या कार्यक्रमात सविता मुंढे यांच्यासह तालुक्यातील आणि जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. नवनाथ वाघमारे यांनी संतोष भाऊ दराडे यांना आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शुभेच्छा देत, समाजहितासाठी कार्य सुरू ठेवण्याचे आवाहन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ नोव्हेंबर २०२५


## नक्कल

छकुलीने ठरविले एकदा
करावी आजीची नक्कल
जुने लुगडे नेसून
पाजू लागली अक्कल

आईला दरडावून म्हणाली
सूनबाई आला मला ताप
साजूक तुपाचा शिरा कर
टाकून बदामाचे काप

अंग माझे दुखतय
हाता पायात भरला वात
गडवाभर मसाल्याचे दूध दे
खात नाही अळणी भात

सर्दी मला झाली
सुंठ मिऱ्याचा दे काढा
थोडे अपचनही झाले
पाण्यासोबत दे लिंबू सोडा

नक्कल तिची पाहून
आजी जोराने हसली
दातात जिभ दाबल
छकुलीने धूम ठोकली



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

# बालहक्क आणि कायदे प्रभावीपणे राबवून अत्याचार शून्य करणे गरजेचे - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी




**कन्नड (अरुण थोरात) :** बालकांचे हक्क आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करून बालकांवरील अन्याय व अत्याचार पूर्णपणे थांबविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.हॉटेल अतिथी येथील डायमंड हॉलमध्ये “बालकांचे हक्क, कायदे आणि उपाययोजना” या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, शासन, प्रशासन, पालक, विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्यात दरी न ठेवता बालकांना योग्य प्रवाहात ठेवणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. बालमजुरी, अन्याय व अत्याचार होणार नाहीत यासाठी सर्व विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडावे, असे आवाहन त्यांनी केले.मागील वर्षभरात जिल्ह्यात 150 पेक्षा अधिक बालविवाह रोखण्यात आल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. तथापि, काही घटनांची माहिती वेळेवर प्राप्त होत नसल्याने बालविवाह झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी बालविवाहविरोधी मोहिमेत सहभागी होऊन आवश्यक माहिती संबंधित विभागांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.कौटुंबिक हिंसा, गर्भपात, पोस्को कायदा, कुपोषण आदींसह बालकांशी संबंधित सर्व कायदे व हक्क प्रभावीपणे आणि कठोरपणे राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्यासह राष्ट्रीय बालहक्क आयोगाचे परमिंदर सिंग, महेंद्र दराडे, कल्पना मोहिते, अश्विनी लाठकर, सौ. पांचाळ, सौ. गाडेकर, दुसाणे, राहुल भारती, नितल नांदेडकर, सतीश सातव,ठाकूर आर.व्हि.आर फुसे, समुपदेशक सोनू अशोक राहींज, सुप्रिया इंगळे, दीपक बजारे, विजय गवळी, आम्रपाली बोर्डे, सचिन दौड, यशवंत इंगोले, नितेश धुर्वे, अशोक सुरडकर, रायभान जाधवसह महिला व बालकल्याण, शिक्षण आणि पोलीस विभागांचे अधिकारी, कर्मचारी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव डोंगरे यांनी केले.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ नोव्हेंबर २०२५

# शिक्षण : व्यक्तिमत्त्व, समाज आणि राष्ट्र घडविण्याची परिवर्तनशील प्रक्रिया

शिक्षण हा मानवी जीवनाचा मूलाधार आहे. मनुष्य जन्मतः केवळ 'जैविक अस्तित्व' घेऊन येतो, परंतु शिक्षणामुळे तो 'मानव' होतो. विचार करणे, निर्णय घेणे, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखणे, मूल्ये अंगीकारणे, समाजात सुसंवाद राखणे, प्रगतीकडे वाटचाल करणे या सर्व गोष्टी शिक्षणातून घडतात. म्हणूनच शिक्षणाला जीवनाचा 'प्राणवायू' म्हणणे सयुक्तिक ठरेल. ११ नोव्हेंबर हा 'राष्ट्रीय शिक्षण दिन' भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण देशभर साजरा केला जातो. मौलाना आझाद यांनी शिक्षणाला केवळ रोजगाराचे साधन मानले नाही, तर त्यांनी शिक्षणाला राष्ट्रनिर्मितीचे साधन, सामाजिक परिवर्तनाचे माध्यम आणि मानवतेचे संवर्धन करणारा आधारस्तंभ मानले. त्यांचा स्पष्ट विश्वास होता की शिक्षण हे सर्वांसाठी समानरित्या उपलब्ध झाले तरच समाजात खरी समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित होईल. म्हणूनच आजच्या काळात शिक्षणाच्या अर्थाचे, उपयोगाचे आणि गरजेचे नव्याने पुनर्मूल्यांकन करणे ही काळाची गरज आहे.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास समाज हा माणसांच्या परस्पर संबंधांचे, विचारांचे, संस्कृतीचे, अधिकारांचे आणि संस्थांचे गुंफण आहे. या संपूर्ण सामाजिक संरचनेचे मुख्य नियंत्रण शिक्षण करत असते. शिक्षण समाजात नवे विचार आणते, जुन्या परंपरांचे चिकित्सक पुनर्विलोकन करते, बदल स्वीकारण्याची प्रेरणा देते आणि समाजाला प्रगत दिशेने पुढे नेत राहते. शिक्षण हे फक्त ज्ञान देणे नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची सर्जनशील प्रक्रिया आहे. समाज जसा बदलत जातो तसाच शिक्षणाचा आविष्कारही बदलत जातो. कालपरत्वे शिकविण्याच्या पद्धती, विषय, उद्दिष्टे, साधने, शिक्षक-विद्यार्थी नाते यांच्या स्वरूपात बदल होत गेले आहेत; परंतु शिक्षणाचा मुख्य हेतू आजही तोच आहे. माणसाला जगण्याची कला शिकविणे आणि समाज अधिक मानवी, न्याय्य व प्रगतिशील करणे.भारतीय समाजाची ऐतिहासिक रचना पाहता शिक्षण नेहमीच सामाजिक स्तरांच्या आधारे नियंत्रित राहिले. प्राचीन काळातील गुरुकुल पद्धतीत ज्ञानाची देवाणघेवाण होत असली तरी सर्वांना समान संधी उपलब्ध नव्हती. काही विशिष्ट वर्णांना ज्ञान मिळण्याचा अधिकार होता, तर इतरांना ज्ञानापासून दूर ठेवण्यात आले. ज्ञानाचे हे केंद्रीकरण समाजातील असमानता वाढविणारे ठरले. मध्ययुगीन काळातही धार्मिक संस्था, राजकीय सत्ता आणि सामाजिक रूढी यांच्या आधारे ज्ञानाची मर्यादा घातली गेली. ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाची सुरुवात झाली, तर्कशास्त्रीय आणि वैज्ञानिक विचारांची जागृती झाली, पण त्याचा उद्देश भारतीय समाजाला ज्ञानसमृद्ध करणे नसून प्रशासनासाठी प्रशिक्षित कर्मचारी मिळवणे हा होता. स्वतंत्र भारताने मात्र शिक्षणाला समाजाच्या केंद्रस्थानी ठेवले. भारतीय संविधानाने शिक्षणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला. 'समानता' आणि 'समावेशकता' हे शिक्षणाचे मार्गदर्शक तत्व म्हणून ठरविले. परंतु आजही शहर व ग्रामीण भाग, आर्थिक स्तर, लिंग, जाती, प्रदेश, आदिवासी आणि दुर्बल गटांमध्ये शिक्षणाच्या संधींत प्रचंड अंतर आहे.आज शिक्षणाच्या क्षेत्रात दिसणारी सर्वात मोठी असमानता म्हणजे 'गुणवत्तेतील तफावत'. मोठ्या शहरांतील कॉर्पोरेट शाळा आधुनिक साधनांनी सुसज्ज आहेत, तर अनेक ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता, प्रयोगशाळा-अभाव, डिजिटल सुविधांची मर्यादा, मुलींसाठी सुरक्षा आणि वाहतूक यांसारखी मूलभूत समस्या कायम आहेत. ज्या मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळते ते समाजात पुढे जातात; तर जे शिक्षणापासून वंचित राहतात ते मागे पडतात. अशा वेळी शिक्षण सामाजिक गतिशीलता थांबविण्याचे साधन ठरते, आणि समाजात नवीन असमानता अधिक स्पष्ट होत जाते. म्हणूनच शिक्षणाचा प्रसार करताना केवळ शाळांची संख्या वाढवणे पुरेसे नाही, तर शिक्षणाची गुणवत्ता, पोहोच, सुरक्षितता, समतोल निधी, प्रशिक्षित शिक्षक आणि प्रगत अभ्यासक्रम हे मुद्दे अत्यंत महत्त्वाचे ठरतात.शिक्षणाचा खरा उद्देश समाजात विवेकपूर्ण नागरिक घडविणे हा आहे. केवळ पदव्या मिळविणे म्हणजे शिक्षित होणे नाही. शिकलेला मनुष्य तर्क करतो, विश्लेषण करतो, समस्या समजून त्यावर उपाय शोधतो, भेदभावाला प्रश्न विचारतो, अंधश्रद्धेला आव्हान देतो आणि न्याय्य समाजाच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घेतो. लोकशाही राष्ट्रासाठी 'सजग' नागरिकांची निर्मिती ही शिक्षणाची सर्वात मोठी देणगी आहे. केवळ मतदान करणे किंवा कायदे माहित असणे म्हणजे नागरिकत्व नाही; तर समाजाच्या भल्यासाठी विचारपूर्वक कृती करणे, सामाजिक समरसता राखणे आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळ देणे हा खरा नागरिकत्वाचा अर्थ आहे. शिक्षण व्यक्तीला ही समग्र जबाबदारीची जाणीव करून देते.शिक्षणाशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. आजचे युग ज्ञानाधारीत अर्थव्यवस्थेचे आहे. देशात उद्योग, तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य, विज्ञान, संशोधन, व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांत कुशल मनुष्यबळाची गरज आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण हे रोजगारक्षमतेचे आणि रोजगारनिर्मितीचे मूळ आहे. देशाचा विकासदर, उत्पादनक्षमता आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता ही थेट शिक्षणाच्या पातळीवर अवलंबून असते. नवीन शिक्षण धोरण २०२० मध्ये कौशल्याधारित शिक्षण, बहुविद्याशाखीय शिक्षण, डिजिटल साक्षरता, संशोधन आणि नवोन्मेष यांना मिळालेला भर महत्त्वाचा आहे. मात्र, धोरणे तेव्हाच परिणामकारक ठरतात जेव्हा त्यांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे, योजनेनुसार आणि सर्वसमावेशक दृष्टीकोनातून केली जाते.शिक्षणात शिक्षकाची भूमिका केंद्रस्थानी आहे. शिक्षक म्हणजे ज्ञान देणारा, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे तो मूल्यांची संस्कृती रुजविणारा. शिक्षक विद्यार्थ्यांच्या अंतर्मनातील प्रतिभा ओळखून तिला योग्य दिशा देतो. शिक्षण यशस्वी होण्यासाठी शिक्षक-विद्यार्थी संबंध विश्वास, आदर आणि सर्जनशील संवाद यांवर आधारित असणे आवश्यक आहे. आज तंत्रज्ञान शिक्षणात महत्त्वाची भूमिका निभावत आहे. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल साधने, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित पद्धती आल्या आहेत, परंतु मानवी भावनिक स्पर्श, प्रेरणा, सहानुभूती आणि संस्कार ही कामे शिक्षकच करू शकतो. 'शिक्षक हा केवळ शाळेत शिकवणारा नसून, तो समाजाचा घडवणारा शिल्पकार आहे' हे विसरून चालणार नाही.स्त्री शिक्षण हा समाज परिवर्तनाचा महत्त्वाचा भाग आहे. स्त्री शिक्षित झाली तर कुटुंब शिक्षित होते, पुढची पिढी जागरूक होते, समाज प्रगत होतो. मुलींना माध्यमिक आणि उच्च शिक्षण मिळण्यात आजही ग्रामीण भागात अडथळे आहेत. सामाजिक अडथळे, लिंगभेद, पायाभूत सुविधांचा अभाव, लवकर लग्नाची प्रथा, सुरक्षिततेची चिंता हे प्रश्न दूर केल्याशिवाय 'समता' ही कल्पना केवळ घोषणेतच राहील. त्यामुळे मुलींना शिक्षण देण्याचे कार्य हे केवळ शासकीय धोरण नसून संपूर्ण समाजाने स्वीकारलेली मूल्यबद्ध जबाबदारी असणे आवश्यक आहे.शिक्षणाचा आणखी एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे मूल्यशिक्षण होय. आज जग झपाट्याने बदलत आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाने सुविधा वाढल्या आहेत, पण माणसामधील भावनिक अंतरही वाढले आहे. स्वार्थ, स्पर्धा, सामाजिक तणाव, धार्मिक वैमनस्य, हिंसा आणि असहिष्णुता समाजात चिंतेचे विषय बनत आहेत. अशा वेळी शिक्षणाने फक्त ज्ञान न देता 'मानवी मूल्ये' पेरणे अत्यावश्यक आहे. सहजीवन, परस्पर आदर, करुणा, जबाबदारी, सहिष्णुता, संवेदनशीलता ही मूल्ये शिकवणारे शिक्षण राष्ट्राला स्थिर, मजबूत आणि सुदृढ बनवते.राष्ट्रीय शिक्षण दिन हा केवळ एका नेत्याची जयंती नाही. तो शिक्षणाच्या मूल्यांचा पुनःस्मरणाचा, समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचविण्याच्या संकल्पाचा दिवस आहे. हा दिवस आपल्याला सांगतो की शिक्षणात असमानता राहिली, तर समाजातही समता निर्माण होऊ शकत नाही. शिक्षण सर्वांना समानरित्या उपलब्ध झाले, गुणवत्तापूर्ण झाले, मूल्याधारित झाले आणि सर्वसमावेशक झाले तर समाज आपोआप न्याय्य, सुसंस्कृत आणि प्रगतिशील बनेल. म्हणून आजच्या राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने आपण हे स्पष्टपणे ठरवूया की शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे साधन नाही, ते 'जीवन घडविण्याची कला' आहे. शिक्षण हे केवळ स्पर्धेसाठी नाही, ते 'समानतेसाठी' आहे. शिक्षण हे केवळ व्यक्तीला उंचावण्यासाठी नाही, ते 'समाज आणि राष्ट्र उंचावण्यासाठी' आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जी कुणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. तसेच मौलाना अबुल कलाम आझाद यांनी म्हटले होते की शाळा बंद पडली तर राष्ट्र बांधणे थांबते. म्हणून शिक्षणाचा दिवा फक्त प्रज्वलित करायचा नाही, तर सतत तेजस्वी ठेवायचा आहे. कारण शिक्षण हे भविष्य घडवते, आणि घडवलेले भविष्यच राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करते.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) मो. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002